Estd: 1962

NAAC "A++" Grade with CGPA 3.52

# SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

Vidyanagar, Kolhapur-416004 Maharashtra, (India)

Inquiry Cell: 0231-2609143, www.unishivaji.ac.in

Ref.No.SU/2026/NYPC-04 **Date: 22-09-2026**

**प्रति,**
**मा. प्राचार्य**, संलग्न महाविद्यालये /
**मा. अधिविभाग प्रमुख**, पदव्युत्तर विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**विषय**: १८ व्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेसाठी विद्यार्थी निवड करणेबाबत.....

**संदर्भ**: संसदीय कार्य मंत्रालय, भारत सरकारचे उपसचिव मा. अनिल कुमार यांचे दिनांक १७ ऑगस्ट २०२६ रोजीचे पत्र.

**महोदय,**

संसदीय कार्य मंत्रालय, भारत सरकार आणि शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने ऑक्टोबर महिन्यामध्ये **१८ व्या राष्ट्रीय युवा संसद** स्पर्धेचे आयोजन केले जाणार आहे.

त्यासाठी आपल्या महाविद्यालयातील/अधिविभागातील वक्तृत्व, वादविवाद, युक्तिवाद, नेतृत्वगुण, स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे, सखोल वाचनाची आवड इत्यादी कौशल्ये असणाऱ्या एका विद्यार्थ्याची निवड करून त्याचे नाव प्रा. (डॉ.) प्रल्हाद माने, समाजशास्त्र विभाग, समन्वयक, राष्ट्रीय युवा संसद स्पर्धा, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या **pmm_soc@unishivaji.ac.in** या ईमेलवर **दिनांक ०४ ऑक्टोबर २०२६ पर्यंत** पत्राने कळवावे. तसेच निवडलेल्या विद्यार्थ्याला **दिनांक ०५ ऑक्टोबर २०२६** रोजी सकाळी ११:०० वाजेपर्यंत महाविद्यालय/ अधिविभागाचे पत्र घेऊन मानव्यशास्त्र सभागृह, शिवाजी विद्यापीठ येथे उपस्थित राहण्यास सांगावे.

स्पर्धेत भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना युवा संसदे मध्ये सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्षामध्ये भूमिका पार पाडण्यासाठी पुढील विषयांवर तयारी करणे आवश्यक आहे;

**१. Use of AI कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर**
**२. Rural Development: ग्रामीण विकास**
**३. Issues related to Youths: युवकांशी संबंधित समस्या/प्रश्न**
**४. Sustainable Development: शाश्वत विकास**
**५. Unemployment: बेरोजगारी**
**६. Farmer's issues: शेतकऱ्यांचे प्रश्न**
**७. Women related issues : महिला विषयक मुद्दे**
**८. Environment related issues: पर्यावरणाशी संबंधित समस्या/प्रश्न Clean India: स्वच्छ भारत**
**९. Internal and External Security: अंतर्गत आणि बाह्य सुरक्षा**
**१०. Digital India: डिजिटल इंडिया**
**११. National Education Policy-2020: राष्ट्रीय शैक्षणिक-धोरण–२०२०**
**१२. Climate Change: हवामान बदल**

राष्ट्रीय युवा संसदेमध्ये वरील विषयांवर चर्चा अपेक्षित आहे. युवा संसदेच्या कामकाजामध्ये शपथ ग्रहण करणे, नवीन मंत्र्यांची ओळख, शोक प्रस्ताव सादर करणे, संसदीय शिष्टाचार, प्रश्नोत्तराचा तास, तारांकित प्रश्न, अतारांकित प्रश्न, आयत्या वेळचे विषय, बिल पास करणे, इत्यादी संबंधी कामकाजावर चर्चा होणार आहे. राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेच्या माहितीसाठी **प्रा. (डॉ.) प्रल्हाद माने**, समन्वयक, युवासंसद, यांच्याशी संपर्क साधावा. कृपया आवश्यक ती कार्यवाही करावी.

**कळावे,**

**आपले विश्वासू,**

**प्रा. (डॉ.) प्रल्हाद माने**
समन्वयक, राष्ट्रीय युवा संसद स्पर्धा
**Professor**
**Department of Sociology,**
Shivaji University, Kolhapur-416004.

**डॉ. एस. जी. घाणे**
संचालक, विद्यार्थी विकास मंडळ